भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०४/२०१७

**१) अनोळखी ईसमांनी रोडवर थांबलेल्या ईसमास चाकुचा धाक दाखवुन सोन्याचे दागीने,घडयाळ,नगदी पैसे जबरीने हिसकावुन चोरून नेल्याने गुन्हा नोंदः—**

दिनांक २५/०४/०१७ चे २२.३० वा. ते ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपले मित्रा सोबत भंडाऱ्यावरून नागपुर कडे जात असता लघवीकडे थांबुने रोडवर थांबले व त्याचा मित्र रोडचे बाजुला लघवी करित असतांना भंडारा कडुन एका मोटार सायकल वरून तीन अनोळखी ईसम आले व एकाने फिर्यादीचे पोटाला चाकु लावुन व दुसऱ्या व्यक्तीने फिर्यादीचे हातातील दोन सोन्याच्या अंगठया २२ ग्रॅम किंमती ४०,०००/रू. व टायटन कंपनीची घडयाळ किं. ४०००/रू. व नगदी ३२००/रू. असा एकुन ४७,२००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी बाबा नागोवरावजी केचे वय ५२ वर्ष रा. प्लॉट नं. १०२लक्ष्मी अपार्टमेंट नागपुर याचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. जवाहरनगर येथे कलम ३९२ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. किचक पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) संगनमत करून माहीत न होता फसवनुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०.१०.२०१५ ते २२/०१/२०१६ चे दरम्यान यातील आरोपीतांनी अर्जदार सतीश जुगल किशोर नसीने रा. राममंदीर वार्ड भंडारा यांनी बेला भोजापुर येथील प्लॉटचे ६ लाख रूपये घेवुन करार नामा करून दिले यातील आरोनीतांनी संगनमत करून अर्जदाराला माहीत न होता परस्पर दुसऱ्यांना विकुन अर्जदाराची फसवणुक केल्याने अर्जदाराने दिलेल्या अर्जचौकशी वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा. गिन्हेपुंजे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ४२०,३४ भादवि.. चा गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे

**३) जैववीवीधता उधान सामाजिक वनीकरन येथील सौरउर्जा बॅटरी,पाईप,वायरींग व रॉड चोरी केल्याने गुन्हा नोंद :—**दिनांक १५/०४/२०१७ चे १२.०० ते दि.२१/०४/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील सरकारी स्वर्गाय उत्तमराव पाटील जैववीवीधता उधाण सामाजिक वनीकरण डोंगरला येथील दोन सौरउर्जा दिव्याची बॅटरी व १० फुटाचे १२ एमएम लोखंडी रॉड ८०, ०५ बंडल गार्डन पाईप, लाईनची वायरींग असा एकुन ४२ हजार ४००/रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादी फुलसींग विठ्ठल राठोड वय ४९ वर्ष रा. श्रीराम नगर तुमसर लागवड अधिकारी सामाजिक वणीकरण परिक्षेत्र तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**४) विदयुत करंट लागुन स्लॅपच्या कामाला असलेल्या ईसमाचा अपघाती मृत्यु झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०४/२०१७ चे ०८.४५ वा दरम्यान यातील मृतक कुणाल सुर्यभान मेश्राम वय २७ वर्ष रा जेवनाळा हा यातील आरोपीचे घराचे नवीन बांधकाम करीत असतांना कॉलम तयार करीत असतांनी स्लॅप बांधणीचे काम करीत असतांना बांधकामा जवळुन गेलेल्या ११ केव्ही विदयुत दाबाचे ताराला मृतकाचे हातातील लोखंडी सलाख विदयुत ताराला लागली व सलाखीला करंट आल्यामुळे मृतक हा सलाख हातामध्ये घेवुनच बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पडला व औषधोपचारा दरम्यान मृत्यू पावला यातील आरोपीस विदयुत विभागामार्फत बांधकाम करण्याचा मनाई आदेश लेखी स्वरूपात देवुन सुद्धा बांधकाम बंद केले नाही. यातील मृतकाचे मरणास आरोपी हा कारणीभुत झाल्याने व घटनास्थळाची परीस्थिती पाहता मर्ग क्र १२/१७ कलम १७४ जाफौ चे तपासाचे

एकंदरीत चौकशी अंती सरतर्फे फिर्यादी सफौ टेंभुर्णकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०४ (अ) भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनि चकाटे पो स्टे लाखनी हे करीत आहे.

<u>५) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून मिळुन गुन्हा नोंद:—</u>

दिनांक २६/०४/०१७ चे १०.०५ ते वा. दर. यातील आरोपीने चालकाने आपले ताब्यातील वाहन आमरोड वर सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. लाखांदुर येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.ढोके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

<u>६) नाल्यातील पाण्यात महिला मृत अवस्थेत मिळुन आल्याने मृत्यु . :—</u>

दिनांक २६/०४/२०१७ चे ०३.०० ते ०९.३० वा दरम्यान यातील मृतक सौ. चंद्रकला सुदर्शन मेश्राम वय ३३ वर्ष रा. नेरला ही ६ वर्षा पासुन पागल असुन तीचा औषधोउपचार डॉ. सुहास गजभिये भंडारा यांचे कडे सुरू असुन मृतक ही संडासकडे डब्बा घेवुन निघुन गेली ती पागोरा ते ईटगाव रोडचे नाल्यातील पाण्यात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी सुदर्शन प्रल्हाद मेश्राम वय ४५ वर्ष रा. नेरला यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे

<u>७) घराचे कॉलमला नेवारा पट्टीने गळफास लावुन मृत्यु . :—</u>

दिनांक २६/०४/२०१७ चे ०७.३० वा दरम्यान यातील मृतक विलास शंकर मारवाडे वय ३१ वर्ष रा. बेटाळा याने आपले घराचे बाजुचे कॉलमला नेवारा पट्टीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी दशरथ शंकर मारवाडे वय ३५ वर्ष रा. बेटाळा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाळी येथे कलम १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन मोहाळी हे करीत आहे

<u>८) अवैध दारु अड्डयावर / जुगारावर धाडी . :—</u>

दिनांक २६/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा,जवाहरनगर,मोहाडी,कारधा,वरठी,सिहोरा, आंधळगाव,गोबरवाही,साकोली,पवनी, येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १०९ लिटर हा.भ.दारू + १०० के.जी. सडवा मोहा साहीत्य किंमती १५,५४०/—रु, १३८ लिटर ४२० मीलीलीटर देशी दारू किंमती ७,९०६७/रू. तसेच जुरातुन किंमती १,१००/रू. माल असा एकुण किंमती ९५,७०७/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

<u>९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—</u>

दिनांक २६/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ६३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

27.4.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.